# जिमखाना वार्षिक अहवाल २०२४-२५

शासकीय तंत्रनिकेतन, पुणे येथे जिमखाना अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रम व क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या जातात. संस्थेतील जिमखान्याचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र पाटील (प्राचार्य), जिमखाना उपाध्यक्ष श्री. हनुमंत नाईकनवरे, जिमखाना सह-समन्वयक डॉ.शिरीष धोबे, जिमखाना सचिव श्री. सचिन खडके (खेळ), जिमखाना सचिव श्री. रवि चौथमल ( सांस्कृतिक कार्यक्रम ), सहाय्यक श्री. शंकर ऐवळे व श्री सुभाष बामणे, मदतनीस श्री. मनोज भवारी, श्री बाळकृष्ण चव्हाण व श्री.अजय बेद हे आहेत.

सन २०२४-२५ मध्ये जिमखाना अंतर्गत विविध कार्यक्रम संस्थेत राबविण्यात आले आहे. त्यापैकी उल्लेखनीय कामे पुढील प्रमाणे.

- सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे संस्थेमध्ये एकूण ४४ महापुरुषांच्या **जयंतीचे तसेच पुण्यतिथी** चे कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

- पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग द्वारा आयोजित व त्यांच्या अहवानानुसार दि.९/८/२०२४ ते १५/८/२०२४ या कालावधीमध्ये **"हर घर तिरंगा"** या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले त्यानुसार प्रत्येक घरोघरी तसेच दुकाने ,खाजगी आस्थापना व सर्व शासकीय कार्यालयाच्या इमारतींवर राष्ट्रध्वज फडकविला जाईल या अनुषंगाने संस्थेच्या कार्यक्षेत्रात जनजागृती करण्याचे कार्यक्रम राबविण्यात आले.
- केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण विभाग यांच्या निर्देशानुसार विद्युत विभागामध्ये **नशामुक्ती अभियान** दि.१३/९/२०२४ रोजी राबविण्यात आले.

- भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त २६ नोव्हेंबर २०२४ रोजी **संविधान उद्देशिकेचे सामुहिक वाचन** करण्यात आले.

- विद्यार्थी, अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी नोव्हेंबर २०२४ रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. त्यात एकूण १०५ अधिकारी, विद्यार्थ्यांनी सक्रीय सहभाग दर्शविला .

- जिमखाना अंतर्गत विविध खेळाविषयी बैठकांचे आयोजन करून त्यामध्ये खेळाविषयीच्या सर्व बाबींचे नियोजन करण्यात आले.

- वार्षिक स्नेहसंमेलन २०२५ अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी Volleyball, Cricket, Table-Tennis, Kabbdi असे सांघिक खेळ तसेच Badminton, Carrom, Chess, Athletics असे वैयक्तिक खेळाच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. त्यात एकूण २६८ विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

- वार्षिक स्नेहसंमेलन २०२५ अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रम " अभिरंग" चे आयोजन करण्यात आले आहे .त्याअंतर्गत विद्यार्थ्यांनी गायन, नृत्य इ. कार्यक्रमात सहभाग नोंदवला आहे. तसेच जिमखान्यातर्फे सर्व विद्यार्थ्यांना स्नेहभोजनाची सुद्धा व्यवस्था करण्यात आलेली आहे.

९) आंतर पदविका अभियांत्रिकी विद्यार्थी क्रीडा संघटना अर्थात IEDSSA यांचे राज्याचे मुख्यालय शासकीय तंत्रनिकेतन,पुणे असून सांगण्यास अतिशय आनंद होतो आहे कि, IEDSSA चे पदसिद्ध अध्यक्ष आपल्याच संस्थेचे माननीय प्राचार्य डॉ.राजेंद्र पाटील सर आहेत. त्याच बरोबर विशेष बाब म्हणजे IEDSSA मुख्यालय व जिमखाना यांच्या सहाय्याने संस्थेच्या खेळाच्या मैदानासाठी ०५ लाखांचा निधी मंजूर केला आहे.

१०) IEDSSA च्या Zonal Tournament २०२४-२०२५ या स्पर्धा मध्ये प्राप्त झालेल्या D2 झोन निकालानुसार टेबल टेनिस ,फुटबॉल, अँथलेटीक्स (मुली) ,व्हॉलीबॉल (मुले व मुली) खेळामध्ये दोन्ही संघ Winner ठरले आहेत. तसेच चेस मध्ये मुले व मुली हे दोन्ही संघ Runner-Up ठरले आहेत.

११) यावर्षी वृक्षारोपण, रक्तदान शिबीर , संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान, आरोग्य शिबीर, विद्युत सुरक्षा सप्ताह असे विविध प्रकारचे उपक्रम दरवर्षी प्रमाणे जिमखाना विभागातर्फे आयोजित करण्यात आले.

१२) वाचनसंकल्प महाराष्ट्राचा या अंतर्गत वैशिष्ठ्यपूर्ण पुस्तकांचे वाचन विविध शाखेतील मुलांकडून करून घेण्यात आले.

१३) मा.प्राचार्य यांच्या संकल्पनेतून २०२४ पासून BEST OUTGOING STUDENT पुरस्काराची सुरुवात करण्यात आली असून मागील वर्षी पहिला पुरस्कार **कु.मयुरेश मुळूक,तृतीय वर्ष संगणक** या विद्यार्थ्यांला देण्यात आला आहे.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उन्नती सोबत खेळातील प्रगती,सामाजिक बांधिलकी,प्रज्ञा, करुणा, बंधुता, समता, नेतृत्व असे विविध गुण द्विगुणित करण्यासाठी जिमखाना नेहमीच प्रयत्नशिल असतो.

धन्यवाद

जिमखाना उपाध्यक्ष
शासकीय तंत्रनिकेतन, पुणे.